शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं ४७/२०१८

१.श्री. भगवान पांडूरंग निकम } तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. संचालक,राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी,
पो.साखराळे, इस्लामपूर, ता.वाळवा,जि.सांगली. } वि. प.
२. अध्यक्ष,कासेगाव शिक्षण संस्था, कासेगाव,जि.सांगली.

**तक्रारीचे स्वरूप :**

कासेगाव शिक्षण संस्था, कासेगाव, जि.सांगली यांचे राजारामबापू इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी इस्लामपूर या महाविद्यालयाकडील शिक्षक श्री. भगवान पांडूरंग निकम यांनी दिनांक ०५/०४/२०१७ चा तक्रार अर्ज समितीकडे दाखल केला होता. अर्जात नमुद तक्रार पुढील प्रमाणे.

दि.०५/१०/२०१५ रोजी मला मा.सचालक, राजारामबापू इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी यांनी निलंबित केले. आज अखेर कोणतीही चौकशी केली नाही. किंवा निलंबन मागे घेतले नाही. सद्या मी निलंबित आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ, परिनियमानूसार निर्वाहवेतन देणे आवश्यक असताना दिनांक ०१/०८/२०१६ पासून मला निर्वाहभत्ता दिला नाही व देणार नाही अशी भूमीका सदर संस्थेने लेखी कळविली आहे. ही बाब अन्यायी व बेकायदेशीर असल्याने निलंबन भत्ता देणेबाबत आदेश होण्यासाठी सदरची तक्रार दाखल करीत आहे.

**समितीची निरीक्षणे :**

तक्रारदार यांनी संस्थेने केलेल्या निलंबन कालावधीतील निर्वाहभत्ता मिळणेबाबत तक्रार दाखल केली होती. या अर्जावर समितीसमोर दोन वेळा सुनावणी घेण्यात आली. सुनावणी वेळी तक्रारदार यांनी आपण समितीकडे दाखल केलेल्या तक्रारीबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडे दाद मागीतल्याचे तोंडी सांगीतले होते व दिनांक १०/०१/२०२० च्या पत्राने

सदरच्या तक्रारीबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे दाद मागीतल्याचे कळविले होते. तसेच दिनांक १५/०२/२०२० रोजी तक्रार निवारण कक्षास मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील दाखल केलेली याचिका क्रं. १२७०८/२०१७ ची प्रत ईमेल व्द्वारे पाठविली होती. सदरच्या याचिकेत पुढील प्रमाणे मागणी नमूद आहे. (C) Pending the hearing and final disposal of the writ petition,the Respondent Nos.1 and 2 be directed to reinstate Petitioner in the post of Associate Professor in Respondent No.2 Institute with continuity of service and further be directed to pay the suspension allowance being full wages as provided under the Statute.

सबब तक्रारदार यांनी समितीकडे दाखल केलेल्या निर्वाहभत्ता मिळणेसंदर्भातील तक्रारीबाबत उपरोक्त याचिकेने मा.उच्च न्यायालयातही दाद मागीतल्याचे निर्देशनास येते. मा.उच्च न्यायालयाचे अधिकार या समितीपेक्षा सर्वोच्च असल्याने सदर प्रकरणी तक्रार निवारण समितीने याबाबत निर्णय देणे उचित होणार नाही. तसेच सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने तक्रारदार यांच्या समितीकडील तक्रार अर्जाबाबत पुढील कार्यवाही करता येणार नाही.

दिनांक : 28 FEB 2020

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

अध्यक्ष
(श्री. एस.पी.कुलकर्णी)

सदस्य
(श्री. व्ही. डी. नांदवडेकर )

सदस्य
(श्री. पी.डी. राऊत)

सदस्य
(श्री. आर.बी.तुपे )

सदस्य
(श्री.एन.बी.गायकवाड)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए. कदम)